अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 06 ऑगस्ट 2026 | वर्ष 11 वे | अंक 52 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# तलावातील 'त्या' गूढ पिवळ्या प्रकाशाचे रहस्य अखेर उलगडले!

## तलावाच्या तळाशी सापडला एलईडी चार्जेबल लाईट, पोलीस अन् एसडीआरएफची शोधमोहीम

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील जवराबोडी मेंढा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या रुपाळा मेंढा (आकापूर) येथील छोट्या तलावातील पाण्यावर मागील काही दिवसांपासून दर मिनिटाला लुकलूकणाऱ्या पिवळसर प्रकाशाने संपूर्ण परिसरात मोठे गूढ निर्माण केले होते. कौतुक, आश्चर्य आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण करणाऱ्या या घटनेवर 'ब्रह्मपुरी समाचार' ने प्राधान्याने वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची तातडीने दखल घेत पोलीस व आपत्ती व्यवस्थापन दलाने (SDRF) राबवलेल्या शोधमोहिमेत या रहस्यामागचे मूळ कारण समोर आले असून तलावाच्या तळाशी एक 'LED चार्जेबल लाईट' ब्लिंक होत असल्याचे निष्पन्न झाले आहे.



रुपाळा मेंढा येथील तलावात रात्रीच्या वेळी दिसणारा पिवळा प्रकाश पाहण्यासाठी परिसरातील ६ ते ७ गावांतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. याबाबत 'ब्रह्मपुरी समाचार' मध्ये बातमी प्रसिद्ध होताच पोलीस प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले. ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### 'अंनिस'चा वैज्ञानिक दावा खरा ठरला

**रुपाळा मेंढा (आकापूर) येथील तलावातील पिवळसर प्रकाशाला दैवी प्रकोप अथवा चमत्कार न मानता त्यामागे वैज्ञानिक कारण असल्याचे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) ठामपणे सांगितले होते. पाण्याखाली एखादे इलेक्ट्रॉनिक उपकरण असण्याची दाट शक्यता अंनिसचे राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे यांनी सोशल मीडियाद्वारे वर्तवत प्रशासनाकडे तातडीने तपासाची मागणी केली होती. प्रशासनाने या मागणीची दखल घेत एसडीआरएफ आणि पोलिसांच्या मदतीने शोधमोहीम राबवली असता, तलावाच्या तळाशी ब्लिंक होणारा 'एलईडी चार्जेबल लाईट' मिळून आला. यामुळे अंधश्रद्धेला फाटा देत अंनिसने केलेला वैज्ञानिक दृष्टिकोनाचा दावा अखेर शंभर टक्के खरा ठरला आहे.**

# ब्रम्हपुरीत पोषण आहाराचे कंत्राट अडकले, विद्यार्थी उपाशी राहण्याची भीती

## शासकीय दिरंगाईचा चिमुकल्यांना फटका

ब्रह्मपुरी /का.प्र.

तालुक्यातील शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा पुरता बोजवारा उडाला आहे. नवीन सत्रासाठी पोषण आहार पुरवठा करण्याचे कंत्राट अद्याप अंतिम झाले नसल्याने, पहिली ते आठवीतील हजारो विद्यार्थ्यांना मार्च आणि एप्रिल महिन्यातील शिल्लक राहिलेल्या खाद्यपदार्थांवरच आपले पोट भरावे लागत आहे. दुसरीकडे, लहान मुलांच्या कुपोषण व आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून शिक्षक पदरमोड करून व किराणा दुकानांतून उधारीवर साहित्य आणून पोषण आहाराची तात्पुरती सोय करत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

शासनाच्या नियमानुसार शाळांमधील पटसंख्येनुसार आणि विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार पोषण आहाराचे प्रमाण निश्चित केले जाते. यासाठी दर दोन महिन्यांनी आवश्यक साहित्याची आगाऊ मागणी नोंदवली जाते. जून आणि जुलै या सत्राच्या सुरुवातीच्या महिन्यांसाठी शाळांनी वेळेत मागणी नोंदवूनही अद्याप नवीन साहित्याचा पुरवठा झालेला नाही. नवीन पुरवठादार किंवा कंत्राटदार निश्चित न झाल्याने ही कोंडी निर्माण झाली आहे. यावर तोडगा म्हणून काही शाळांमध्ये गेल्या सत्रातील शिल्लक धान्याचा वापर केला जात आहे, तर काही शाळांमध्ये शिक्षकांनी स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून किंवा स्थानिक किराणा दुकानदारांकडून उधारीवर धान्य व मसाले आणून आहाराची व्यवस्था चालवली आहे.

मार्च महिन्यात वार्षिक परीक्षांचा काळ असल्याने अनेक शाळांमध्ये पोषण आहाराचा वापर अपेक्षेपेक्षा कमी झाला होता. त्या काळात वाचलेले धान्य आणि इतर साहित्य सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगी वापरले जात आहे. मात्र, प्रशासकीय पातळीवर लवकरात लवकर निर्णय न झाल्यास ही हंगामी व्यवस्थाही कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

योजनेअंतर्गत शाळांना तांदूळ, विविध डाळी (मूग, तूर, मसूर), वाटाणा, चवळी, मटकी, हरभरा, सोयाबीन वडी, खाद्यतेल, मीठ आणि मसाले यांचा पुरवठा केला जातो. मात्र, पुरवठादार ठेकेदारांच्या कारभारावर शिक्षकांनी तीव्र असंतोष व्यक्त केला आहे. ५० किलोच्या पोत्यात केवळ ४२ ते ४५ किलोच धान्य निघत असल्याच्या गंभीर तक्रारी आहेत. शाळांमध्ये वजनकाटे उपलब्ध नसल्याचा फायदा ठेकेदार उचलत आहेत. कडधान्य आणि इतर साहित्याचा दर्जा अत्यंत दर्जाहीन असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी उघड-उघड तडजोड केली जात आहे.

शालेय पोषण आहाराचा कंत्राट वेळेत न निघाल्यामुळे तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पोषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने त्वरित या समस्येकडे लक्ष देऊन नवीन आणि दर्जेदार साहित्याचा पुरवठा करावा, तसेच वजनात घट करणाऱ्या व निकृष्ट दर्जाचे साहित्य देणाऱ्या ठेकेदारांवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शिक्षक, पालक आणि स्थानिक लोकप्रतिनिधीं-कडून केली जात आहे.




**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

**www.bramhapuri samachar.com/bs**

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

**बातम्यांकरीता संपर्क :**

**मो. 9503100964**

**मो. 8275715315**

## संपादकीय...

# माफीचे राजकारण!

कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत माफी ही केवळ औपचारिक कृती नसते. ती चुकीची कबुली, जबाबदारीची जाणीव आणि समाजातील तणाव कमी करण्याचा प्रभावी मार्ग असतो. माफी देणे जितके महत्त्वाचे, तितकेच आवश्यक प्रसंगी माफी मागणेही असते. यामुळे संघर्षाला पूर्णविराम मिळतो आणि विश्वासाचे नाते पुन्हा निर्माण होण्यास मदत होते. जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान पंतप्रधानांविषयी आक्षेपार्ह शब्द वापरणाऱ्या तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर तिने सार्वजनिकरीत्या माफी मागितली. आंदोलनाच्या वातावरणात काहींनी प्रोत्साहन दिल्याने आपण मर्यादा ओलांडल्याची कबुलीही तिने दिली. एखाद्या व्यक्तीने स्वत:ची चूक मान्य करून दिलगिरी व्यक्त करणे हा परिपक्वतेचा भाग मानला जातो. त्यामुळे पंतप्रधानांनी तिला माफ करण्याचा निर्णय घेतला, हे स्वागतार्हच म्हणावे लागेल.

परंतु याच घटनेची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांकडून बळाचा अतिरेक झाला का, आंदोलकांशी अयोग्य वर्तन झाले का या प्रश्नांची उत्तरेही तितकीच आवश्यक आहेत. जर अशा घटना घडल्या असतील, तर सरकारने त्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजी वस्तुस्थिती स्वीकारून आवश्यक त्या ठिकाणी दिलगिरी व्यक्त करणे, ही लोकशाही संस्कृतीची अपेक्षा आहे. भारतीय राजकारणात माफी मागण्याची परंपरा नवीन नाही. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीबाबत तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी संसदेत देशाची माफी मागितली होती. त्या माफीने इतिहास पुसला गेला नाही; परंतु सरकारने नैतिक जबाबदारी स्वीकारल्याचा संदेश देशाला आणि पीडितांना मिळाला. अनेक प्रगल्भ लोकशाही व्यवस्थांमध्येही सरकारे चुका मान्य करून माफी मागतात. त्यामुळे शासन कमकुवत होत नाही; उलट त्याची विश्वासार्हता वाढते.

लोकशाहीत सत्ताधाऱ्यांची ताकद केवळ बहुमतात नसते, तर टीका ऐकण्याच्या आणि चुका दुरुस्त करण्याच्या क्षमतेतही असते. आंदोलनकर्त्यांनी संयम पाळावा, ही अपेक्षा जितकी रास्त आहे, तितकीच राज्यकर्त्यांनीही सत्तेचा वापर संयमाने करावा, ही अपेक्षाही तितकीच रास्त आहे. कायद्याची अंमलबजावणी आणि दडपशाही यांतील सीमारेषा धूसर झाली, तर लोकशाही कमकुवत होते. या आंदोलनानंतर केंद्र सरकारला काही निर्णयांमध्ये माघार घ्यावी लागली आणि राजकीय पातळीवर त्याचे पडसाद उमटले. त्यानंतरही विविध नेत्यांच्या वक्तव्यांमुळे वाद वाढत गेले. त्यामुळे मूळ प्रश्न बाजूला राहून आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण अधिक रंगले. अशा वेळी परिपक्व नेतृत्वाने वाद वाढविण्याऐवजी तो शांत करण्याचा मार्ग स्वीकारणे अधिक हिताचे ठरते. माफी मागणे म्हणजे पराभव नव्हे किंवा दोषी ठरणेही नव्हे. उलट लोकशाहीत उत्तरदायित्व स्वीकारण्याची ती एक नैतिक प्रक्रिया आहे. शासनाची भूमिका नेहमीच निर्दोष असेल, असे मानणे वास्तववादी नाही. प्रशासनाकडूनही चुका होऊ शकतात. त्या मान्य करून त्यातून सुधारणा करण्याची तयारी दाखविली, तर नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. आजच्या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येक घटना क्षणात देशभर पोहोचते. त्यामुळे कोणत्याही वादाला दीर्घकाळ जिवंत ठेवणे किंवा त्याचे राजकीय भांडवल करणे सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत संघर्षाचा शेवट संवादाने आणि आवश्यक तेथे दिलगिरीनेच होऊ शकतो. अन्यथा प्रत्येक घटना नव्या वादाला जन्म देत राहते.

लोकशाहीचा आत्मा संघर्षात नसून संवादात आहे. माफी ही त्या संवादाची सुरुवात असू शकते. आंदोलकांनी आपली चूक मान्य केली असेल, तर शासनानेही आपल्या भूमिकेचे आत्मपरीक्षण करण्यास कमीपणा मानू नये. 'माफी देणे आणि माफी मागणे या दोन्ही कृतींमध्ये मोठेपणा आहे'. त्यातूनच लोकशाही अधिक सुदृढ होते आणि समाजात कटुतेऐवजी विश्वास निर्माण होतो. जंतर-मंतर आंदोलनाच्या निमित्ताने उभ्या राहिलेल्या या वादातूनही देशाला हाच संदेश मिळणे अधिक आवश्यक आहे.

# ने.हि. विद्यालय, नवेगांव पांडवच्या विद्यार्थ्यांचा आयएएस अधिकारी तुकाराम मुंडेशी प्रेरणादायी संवाद

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगाव पांडव येथील विद्यार्थ्यांनी सनदी अधिकारी IAS तुकाराम मुंडे यांची अमरावती येथे भेट घेऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला. या प्रेरणादायी भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये एक नवा उत्साह आणि ध्येयाची आग निर्माण झाली आहे. मिशन IAS चे विभागीय संचालक मुनीराज कुथे आणि शाळेचे सहाय्यक शिक्षक मनोज हेमके सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील १३ निवडक विद्यार्थ्यांना अमरावती येथील तरुणांईशी संवाद' या कार्यक्रमासाठी नेण्यात आले होते.



'तरुणांईशी संवाद' या कार्यक्रमात तुफान गर्दी असल्यामुळे पहिल्या दिवशी तुकाराम मुंडे यांच्याशी थेट भेट होऊ शकली नाही. परंतु, न खचता शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संत गाडगे महाराज स्मारकात मुक्काम ठोकला. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे ६:०० वाजताच सर्वजण शासकीय विश्रामगृहावर पोहोचले. तेथे तुकाराम मुंडे यांची भेट घेण्यात त्यांना यश आले. भेटीच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी आपला परिचय दिला. त्यानंतर मुंडे साहेबांनी अत्यंत आपुलकीने मुलांना प्रश्न विचारला. 'तुम्हाला मोठे होऊन काय बनायचं आहे?' त्यावर विद्यार्थ्यांनी एका स्वरात 'IAS!' असे ठाम उत्तर दिले. ग्रामीण भागातील मुलांचा हा आत्मविश्वास आणि उच्च ध्येय पाहून तुकाराम मुंडे साहेब पूर्णपणे चकित झाले.

यानंतर तुकाराम मुंडे यांनी मिशन IAS चे विभागीय संचालक मुनीराज कुथे यांच्याकडे शाळेतील उपक्रमांबद्दल चौकशी केली. यावर शाळेत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांच्यासमोर मांडण्यात आली. दैनंदिन परिपाठापासून ते जंक फूडला विरोध करत 'चणे-फुटाणे वाटप' यासारख्या आरोग्यदायी आणि अभिनव उपक्रमांची माहिती ऐकून मुंडे साहेबांनी शाळेच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली.

संवादाच्या शेवटी तुकाराम मुंडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी आणि IAS होण्याच्या स्वप्नासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांनी अत्यंत प्रेमाने सर्व मुलांच्या पाठीवरून हात फिरवला आणि त्यांच्या मनात जिद्द अन् ध्येयाची आग पेटवून त्यांचा निरोप घेतला. या यशस्वी आणि प्रेरणादायी दौऱ्यामुळे ने. ही. विद्यालय नवेगाव पांडवच्या विद्यार्थ्यांमध्ये आणि परिसरातून शिक्षक, मार्गदर्शक व पालकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कॉफी, रील्स आणि जुन्या आठवणींचा मेळा!

## ब्रम्हपुरीत मैत्री दिन उत्साहात साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

मैत्रीच्या अतूट आणि जिवाभावाच्या नात्याचा उत्सव असलेला 'फ्रेंडशिप डे' (मैत्री दिन) रविवारी अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. सुटीचा दिवस असल्याने सकाळपासूनच सर्वत्र सेलिब्रेशनचा मूड पाहायला मिळाला. शहरातील प्रमुख रस्ते, कॅफे, रेस्टॉरंट्स, मॉल आणि फूड स्ट्रीटवर मित्र-मैत्रिणींच्या ग्रुप्सनी गर्दी केली होती. एक कप कॉफीच्या चुस्कीपासून ते रात्रीच्या धमाकेदार डिनर पार्टीपर्यंत प्रत्येकाने आपापल्या शैलीत या दिवसाचा आनंद लुटला.

यंदाच्या मैत्री दिनात नव्या म्हणजेच 'जेनझी' (Gen Z) पिढीचा उत्साह विशेष लक्षवेधी ठरला. तरुणाईने ट्रेंडिंग गाण्यांवर रील्स तयार करणे, 'बेस्टीज फॉरेव्हर' अशा खास कॅप्शनसह इन्स्टाग्रामवर स्टोरीज आणि पोस्ट शेअर करणे याला पसंती दिली. याशिवाय थीम फोटोशूट, लाईव्ह म्युझिक, ब्रंच पार्टी, गेमिंग झोन आणि ग्रुप आउटिंगचा आनंद तरुणांनी लुटला. काहींनी तर आपल्या मैत्रीचा प्रवास दर्शवणारे छोटे व्लॉग आणि खास व्हिडीओ एडिट करून सोशल मीडियावर शेअर केले.

दिवसभरात शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयांमधील मित्रमंडळी एकत्र आली होती. अनेकांनी एकमेकांना आकर्षक भेटवस्तू देत मैत्रीचा बंध घट्ट केला. सायंकाळनंतर ब्रह्मपुरीतील प्रसिद्ध कॅफे परिसर, रेस्टॉरंट्स आणि फूड स्ट्रीटवर गप्पा मारणाऱ्या मित्रांचे ग्रुप्स दिसून आले. काहींनी चित्रपटगृहात जाऊन सिनेमा पाहणे पसंत केले, तर मैत्रिणींच्या ग्रुप्सनी शॉपिंग आणि पार्टी करत दिवस खास बनवला.

केवळ तरुणच नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांनीही मैत्री दिन मोठ्या आनंदात साजरा केला. निवृत्त सहकारी आणि शाळा-महाविद्यालयातील जुन्या मित्रांनी एकत्र येत गप्पांचा फड रंगवला आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. याचसोबत काही स्थानिक युवक संघटना व स्वयंसेवी संस्थांनी सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून मैत्री दिनाला अर्थपूर्ण स्वरूप दिले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शुभेच्छांचा वर्षाव सुरू होता.

## विनोदिनी

मनी : (प्रियकराला फोनवर) ढगांचा गडगडाट ऐकला की तुझी आठवण येते.
पाऊस आला की तुझी आठवण येते.
पावसाचे थेंब अंगावर पडायला लागले की तुझी आठवण येते.
मन्या : अरेच्चा... माहितेय! माहितेय!! तुझी छत्री माझ्याकडे आहे.
परत करीन, रडू नकोस..!!

# ब्रम्हपुरीला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी हायकोर्टात दाद मागणार

## ब्रम्हपुरी जिल्हा निर्मितीचा लढा अधिक तीव्र होणार, १५ ऑगस्टनंतर तहसिलवर धडकणार भव्य मोर्चा!

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी जिल्हा निर्मितीचा लढा अधिक तीव्र करण्याचा आणि अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय ब्रह्मपुरी येथे आणण्यासाठी थेट उच्च न्यायालयात (हायकोर्ट) दाद मागण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समितीच्या सभेत घेण्यात आला.

०२ ऑगस्ट २०२६ रोजी सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे होते. तर विनोद झोडगे पाटील मुख्य निमंत्रक, प्राचार्य डॉ. सुयोग बाळबुद्धे निमंत्रक, राजू भागवत कोषाध्यक्ष तथा सल्लागार, प्रशांत डांगे निमंत्रक, अविनाश राऊत नगरसेवक, हे विशेष अतिथी म्हणून मंचकावर उपस्थित होते. तथा सभेला मार्गदर्शन केले. सभेचे प्रास्ताविक व संचालन राजू भागवत कोषाध्यक्ष तथा सल्लागार यांनी केले.

सभेमध्ये चिमूर येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय ब्रह्मपुरीला स्थानांतरित करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा व कोर्टाच्या न्यायालयीन खर्चासाठी मा.आमदार तथा माजी मंत्री विजयभाऊ वडेट्टीवार यांच्याकडे पाठपुरावा करून तथा गावातून 'लढा निधी' उभारण्याचे ठरविण्यात आले. न्यायालयात केस दाखल करण्यासंदर्भात हायकोर्टाचे वकिला सोबत चर्चा करण्यासाठी ५ ऑगस्ट रोजी समितीचे शिष्टमंडळ नागपूरला जाणार आहे. तथा मा. चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री यांची भेट घेऊन ब्रह्मपुरीची बाजू मांडणार आहेत.

याकामी ग्रामीण भागात जिल्हा निर्मितीबाबत जनजागृती मोहीम राबवली जाईल. तसेच येत्या १५ ऑगस्टनंतर ब्रह्मपुरी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याची तथा कोर्ट केसकरिता आवश्यक कागदपत्रांची जमवाजमव करण्याचे, आगामी गणेशोत्सव व दुर्गोत्सवाच्या काळात प्रत्येक मंडपाजवळ 'ब्रह्मपुरी जिल्हा निर्मिती 'चे जनजागृती बॅनर लावण्याचे तसेच या लढ्यात केवळ ब्रह्मपुरीच नव्हे, तर शेजारील नागभीड, सिंदेवाही आणि सावली तालुक्यातील नागरिक व पदाधिकाऱ्यांनाही सामावून घेत हा लढा अधिक व्यापक व तीव्र स्वरूपाचा करण्याचे ठराव घेण्यात आले.

सभेत प्रशांत घुटके, डॉ. बाळक्रिष्ण शेळके, शंकरराव उराडे, डॉ. खिजेंद्र गेडाम, सुनील भिखार, अविनाश राऊत (नगरसेवक), प्रशांत डांगे, प्राचार्य डॉ. सुयोग बाळबुद्धे, विनोद झोडगे, प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे, आदी वक्त्यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी आशिष देशमुख (मनसे शहर अध्यक्ष), ओमप्रकाश सोनटक्के (मनसे तालुकाध्यक्ष), अशोक दुनेदार, आकाश खंडाळकर, दत्तू टिकले, घनश्याम कावळे, अमित रोकडे, पवन जयस्वाल, अंकज कानझोडे, राजू उरकुडे, अनिल नंदनवार, केतन पेशने यांच्यासह बहुसंख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# दीन-दलितांचा बुलंद आवाज म्हणजे अण्णाभाऊ साठे - अशोक भैया

### लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती



ब्रह्मपुरी/का.प्र.

'समाजातील दीन - दलितांच्या बाजूने आपल्या शाहिरीतून व साहित्यातून अण्णा भाऊंनी आवाज उठविला. अण्णा भाऊंचे विपुल साहित्य हे सामाजिक उत्थानासाठी होते, तो दीन -दलितांचा बुलंद आवाज होता' असे विवेचन नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी केले. ते ने.हि. महाविद्यालयात लोकशाहिर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त बोलत होते.

सर्वप्रथम संस्थासचिव अशोक भैया व प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी अण्णा भाऊंच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित डॉ रेखा मेश्राम, प्रा विनोद नरड, अधीक्षक संगीता ठाकरे, डॉ रतन मेश्राम, डॉ सुनिल चौधरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ कुलजित शर्मा, डॉ राजू आदे, डॉ विवेक नागभीडकर, आलोक मेश्राम, रोशन डांगे इत्यादी मान्यवरांनी फोटोला पुष्प वाहून आपली आदरांजली वाहिली.

यानिमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अण्णा भाऊ साठेंच्या ग्रंथांची प्रदर्शनी लावण्यात आली होती व विद्यार्थ्यांसाठी 'लोकशाहिर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे' निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्राम यांनी केले.

**जल है तो कल है...**

# बाजार समितीसमोरील वाळलेला वृक्ष तोडा

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या बाजूला आणि कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील बोडेगाव रस्त्यालगत असलेला पिंपळवृक्ष कितीतरी दिवसांपासून सुकलेल्या अवस्थेत उभा आहे. इथून शाळेकरी मुलं, बोंडेगाव - कुर्झा वार्डातील नागरिक ये-जा करतात. एखाद्यावेळी हा वृक्ष कोलमडून जीवीतहानी होऊ शकते.



नगर परिषदेने ही बाब लक्षात घेऊन पुढील धोका टाळण्यासाठी तात्काळ या मोठ्या वृक्षाला तोडून पुढील धोका टाळवा. सध्या पावसाचे दिवस सुरू असून ऐन रोडवर असलेला हा झाड केव्हाही पडू शकतो, त्याआधी हा पिंपळवृक्षाची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. अनेकांच्या हे लक्षात येऊनही त्याकडे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे, तरी तातडीने हा प्रश्न नगर पालिकेने निकाली काढावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# अर्धसाप्ताहिक त्रिकालनेत्रने नेत्रदिपक कामगिरी केली

### - माजी आम. कृष्णा गजबे



देसाईगंज/प्रतिनिधी

स्थानिक पातळीवर निष्पक्ष आणि आक्रमक पत्रकारितेचा ठसा उमटविणाऱ्या अर्ध साप्ताहिक 'त्रिकालनेत्र' ने आपल्या यशस्वी वाटचालीचे २५ वर्ष पूर्ण करून २६ व्या वर्षात म्हणजेच हीरक (रौप्य) महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे कोणतेही वृत्तपत्र चालवताना अनेक समस्या येतात त्या यशस्वी पणे पार पाडतांना या अर्ध साप्ताहिकाने अतिशय नेत्र दीपक कामगिरी केली आणि केवळ देसाईगंज तालुक्याचं नाही तर परिसरात नावलौकिक कमावले असून लोकांच्या हृदयात आपले स्थान निर्माण केले असल्याचे मत माजी आमदार कृष्णा गजबे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. ते स्थानिक गजानन महाराज मंदिरात दि. ३१ जुलै २०१६ रोज शुक्रवार ला आयोजित अर्ध साप्ताहिक 'त्रिकालनेत्र' च्या रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केल्या बद्दल आयोजित उद्घाटन पर कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नगराध्यक्ष लताताई सुंदरकर ह्या होत्या, उद्घाटक माजी आ. कृष्णा गजबे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून भाग्यवानजी खोब्रागडे, प्राचार्य डॉ. एस.एन. पठाण, न.प. उपाध्यक्ष नरेश विठ्ठलानी, माजी नगराध्यक्ष जेसा मोटवाणी, उद्योगपती आकाश अग्रवाल, न.प.चे नियोजन सभापती पिंकु बावणे, जेष्ट उद्योजक मनोहर डांगे, नगरसेवक राजु जेठानी, राजु रासेकर, माजी नगरसेवक गणेश फाफट आदी मंचावर उपस्थित होते.

स्व. प्रभातकुमार दुबे यांनी देसाईगंज शहरात साप्ताहिक 'त्रिकालनेत्र' च्या माध्यमातून पत्रकारितेचे एक छोटेसे रोपटे लावले होते. आज या लहानशा रोपट्याचे एका विशाल वट वृक्षात रूपांतर झाले आहे ही साधी बाब नाही, कोणत्याही प्रकारची आर्थिक पाठबळ नसतांना एवढा विकास करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे असेही मत माजी आमदार कृष्णा गजबे यांनी व्यक्त केले.

यावेळी पत्रकार प्रा. दिलीप कहुरके, इलियास खान पठाण, राजरतन मेश्राम यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक संपादक प्रकाशचंद्र दुबे यांनी केले. संचालन पत्रकार विष्णु दुनेदार यांनी तर आभार पंकज चहांदे यांनी मानले.

कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष हिरा मोटवाणी, माजी न.प. उपाध्यक्ष राधेश्याम काबरा, संतोषकुमार शामदासानी, मोतीलाल जेठानी यांचेसह बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीतील अत्याधुनिक ई-लायब्ररी १० महिन्यांपासून कुलूप बंद

## गरजू विद्यार्थी लाभापासून वंचित

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक गरीब, गरजू आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लाखो रुपये खर्चून उभारलेली अत्याधुनिक E-लायब्ररी प्रशासकीय उदासीनतेचा बळी ठरली आहे. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात उद्घाटन होऊन तब्बल १० महिने उलटले, तरीही आजमितीस या लायब्ररीचे कुलूप उघडलेले नाही. 'उद्घाटन फक्त फोटोसेशन आणि निवडणुकीच्या प्रसिद्धीपुरतेच होते का?' असा संतप्त सवाल आता ब्रह्मपुरीतील विद्यार्थी आणि नागरिक विचारत आहेत.

ब्रह्मपुरी शहर आणि परिसरातील MPSC, UPSC, NEET, JEE, विज्ञान, कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत आणि सुसज्ज जागा मिळावी, या उद्देशाने नगर परिषदेच्या माध्यमातून ही E-लायब्ररी उभारण्यात आली. एकाच वेळी ४०० विद्यार्थी बसून अभ्यास करू शकतील अशी भव्य रचना इमारतीची आहे. ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार, नगराध्यक्ष योगेश मिसार व विविध अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी या वास्तूचे मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले होते. मात्र, उद्घाटनाचा तो दिवस सोडला, तर आजपर्यंत एकाही विद्यार्थ्याला या वास्तूचा लाभ घेता आलेला नाही.

ज्या E-लायब्ररीमुळे ब्रह्मपुरीतील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडणार होते, ती लायब्ररी आज केवळ 'शोभेची वस्तू' बनून राहिली आहे. अभ्यासासाठी हक्काची जागा नसल्यामुळे आजही अनेक गरजू विद्यार्थ्यांना खासगी अभ्यासिकांचा महागडा खर्च सोसावा लागत आहे किंवा जागेअभावी वणवण भटकावे लागत आहे. 'इमारत उभी राहणे आणि तिचे उद्घाटन होणे हे यश नाही, तर ती विद्यार्थ्यांच्या वापरासाठी प्रत्यक्ष सुरू होणे हे खरे यश आहे!' सत्ताधारी असोत वा विरोधी पक्ष, विद्यार्थ्यांच्या या गंभीर आणि महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वच राजकीय नेते सोयीस्कर मौन बाळगून आहेत, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. लोकप्रतिनिधींनी दाखवलेले हे स्वप्न केवळ नगर परिषद निवडणुकीच्या आश्वासनापुरतेच मर्यादित होते का, असा संशय आता बळावत आहे. विद्यार्थ्यांचे प्रशासनाला तिखट सवाल उपस्थित केले आहेत. यात १० महिने उलटले तरी लायब्ररी सुरू का झाली नाही? हे उद्घाटन फक्त राजकीय प्रसिद्धी आणि फोटोसेशनसाठीच केले गेले होते का? गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना या जागतिक दर्जाच्या सुविधेचा लाभ नक्की कधी मिळणार? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी नगर परिषद व स्थानिक प्रशासन घेणार का? विद्यार्थ्यांना अजून किती दिवस फक्त आश्वासनांवर ठेवणार? आदी प्रश्नांचा समावेश आहे.

ऑगस्ट २०२६ उजाडले तरीही परिस्थिती 'जैसे थे' आहे. आता विद्यार्थ्यांना पोकळ आश्वासने नको आहेत, तर प्रत्यक्ष कृती हवी आहे. नगर परिषद प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी या विषयाचे गांभीर्य ओळखून हीलायब्ररी तात्काळ पूर्ण क्षमतेने सुरू करावी, अशी जोरदार मागणी ब्रह्मपुरीतील छात्रशक्तीकडून केली जात आहे. जर ही लायब्ररी लवकर सुरू झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला आहे.

# जिल्हास्तरीय कनिष्ठ ॲथलेटिक्स स्पर्धेत ब्रम्हपुरीच्या खेळाडूंचे यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा क्रीडा संकुल, चंद्रपूर येथे महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेच्या अधिपत्याखाली व चंद्रपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने दिनांक २ ऑगस्ट रोजी आयोजित जिल्हास्तरीय कनिष्ठ ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत द ट्रॅक अँड फील्ड क्लब, ब्रम्हपुरीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

१४ वर्षांखालील मुलांच्या ट्रायथलॉन 'सी' प्रकारात कृष्णा किशोर महाजन याने सुवर्णपदक जिंकले, तर १४ वर्षांखालील मुलींच्या ट्रायथलॉन 'बी' प्रकारात सृष्टी रामटेके हिने सुवर्णपदक पटकावले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आयुष राऊत याने लांब उडी व ६० मीटर धावणे या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके पटकावली. शौर्य पाटील याने लांब उडीत व ६०० मीटर धावण्यात रौप्यपदके मिळविली. मोहित राऊत याने उंच उडी स्पर्धेत रौप्यपदक पटकावले, तर प्रीतेश राऊत याने उंच उडी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदकाची कमाई केली. १८ वर्षांखालील मुलींच्या लांब उडी स्पर्धेत तुलसी मेश्राम हिने रौप्यपदक पटकावले. तसेच २० वर्षांखालील मुलांच्या ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रजत वैद्य याने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक जिंकले आणि २७ ते ३० ऑगस्ट दरम्यान डेरवण (चिपळूण) येथे होणाऱ्या ४० व्या ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेसाठी स्थान निश्चित केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ने.हि. कन्या विद्यालयाच्या २४ विद्यार्थीनींचे यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथील मागील वर्षाच्या वर्ग ७ वीच्या ११ विद्यार्थिनी ज्यामधे कु खुशी किरण मिसार, कु डिंपल सुरेश राऊत, कु मानवी विजय प्रधान, कु जिज्ञासा बालाजी पिंपळकर, कु आरोशी विकास पंदिलवार, कु तृप्ती अनिल राऊत, कु गीतिका अरविंद देशमुख, कु सलोनी घनश्याम बुराडे, कु श्रावणी रोशन वैरागडे, कु प्रिया नरेश पिंपरे, कु समृद्धी खामणकर तसेच वर्ग चौथी मधून वेगवेगळ्या शाळांमधून ने हि विद्यालयात वर्ग पाचवी मध्ये प्रवेश घेतलेल्या १३ विद्यार्थिनि ज्यामधे कु आरजू विशाल वंजारी, कु शांभवी देवेंद्र राजुरिया, कु दिव्या पुरुषोत्तम पेंदाम, कु वैष्णवी दुर्योधन भेंडारकर, कु स्वरा हरिश्चंद्र भानारकर, कु स्वरा धनराज पेंदाम, कु सोमय्या नितीन खोब्रागडे, कु सौम्या संजय बिंजवे, कु प्रियल तानाजी ढोंगले, कु ओवी अश्विन लूटे, कु माही महिपाल माटे, कु अनुराधा किशोर ठाकरे, कु नव्या शेखर शिउरकर यांनी महाराष्ट्र शासन आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिक वाढवला आहे.

सदर शिष्यवृत्ती ही विद्यार्थिनींना सलग तीन वर्षे मिळणार असून विद्यार्थिनींच्या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशा निमित्य संस्थेचे सचिव अशोकजी भैया, मुख्याध्यापिका पी व्ही बनपुरकर, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग आठवीच्या ११ व वर्ग पाचवीच्या १३ विद्यार्थिनींनी मिळवलेल्या सुयशामुळे विद्यालयात प्रेरणादायी व उत्साहाचे वातावरण आहे.

# मासेमारीस गेलेल्या एकाचा मृत्यू तर एक बेपत्ता

ब्रह्मपुरी/का.प्र.

मासेमारीसाठी गेलेल्या दोन मित्रांपैकी एकाचा नाल्याच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे, तर त्याचा दुसरा मित्र अजूनही बेपत्ता आहे. अरुण श्रावण डोंगरवार (वय ३९) असे मृत व्यक्तीचे नाव असून जयपाल प्रल्हाद नाकतोडे (वय ३५, दोघेही रा. उदापूर) यांचा शोध अद्याप सुरू आहे. मात्र, आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे शोधमोहिमेत मोठा अडथळा निर्माण झाला असून पोलीस प्रशासनाकडूनही यावर हताशा व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उदापूर येथील रहिवासी अरुण डोंगरवार व जयपाल नाकतोडे हे दोघे मित्र ३० जुलै २०२६ रोजी दुचाकीने गावाजवळील गराडी नाल्यावर मासे पकडण्यासाठी गेले होते. मात्र, रात्र झाली तरी दोघेही घरी न परतल्याने नातेवाइकांनी व ग्रामस्थांनी सर्वत्र शोध घेतला, परंतु त्यांचा काहीही सुगावा लागला नाही. दरम्यान, १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास पारडगाव येथील शेताजवळील नाल्याच्या पाण्यात अरुण डोंगरवार यांचा मृतदेह तरंगताना आढळून आला. मासेमारी करताना पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही खोल पाण्यात ओढले गेले असावेत आणि बुडून अरुण यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

दुसरीकडे, बेपत्ता जयपाल नाकतोडे यांचा शोध घेण्यासाठी ब्रह्मपुरी पोलिसांकडून प्रयत्न केले जात आहेत. मात्र, ५ दिवसाचा कालावधी लोटूनही अरूणचा मृतदेह शोधण्यात प्रशासनाला अपयश येत आहे.

# ब्रम्हपुरीच्या स्मशानभूमीची दुरवस्था: आठ खांब जीर्ण, दुर्घटनेची भीती

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील हिंदू समाजाच्या स्मशानभूमीची अवस्था सध्या अत्यंत खराब झाली असून, स्मशानभूमी परिसरातील तब्बल आठ खांब जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. हे खांब केव्हाही कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून,नगर प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



ब्रम्हपुरी हे एक मोठे शहर असून येथे मोठ्या संख्येने ओबीसी व अन्य समाजबांधव वास्तव्यास आहेत. हिंदू समाजाच्या अंत्यसंस्कारासाठी महत्त्वाची असलेल्या स्मशानभूमीची अशी दुरवस्था होणे ही चिंतेची बाब आहे. स्मशानभूमीतील मूलभूत सुविधांकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. ब्रम्हपुरी नगरपरिषदेत सत्ता असतानाही स्मशानभूमीच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील इतर समाजांच्या अंत्यसंस्काराच्या ठिकाणी तुलनेने चांगल्या सुविधा उपलब्ध असताना, हिंदूव अन्य समाजाच्या स्मशानभूमीची अशी दुरवस्था का, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

धोकादायक झालेले आठही खांब तातडीने दुरुस्त त्वरीत करावी अथवा नव्याने उभारण्यात यावेत, परिसराची स्वच्छता करण्यात यावी, त्याच बरोबर वाढलेली छोटी झाडे स्वच्छता करावी आणि स्मशानभूमीमध्ये आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी, ही नागरिकांची अपेक्षा आहे.

## ने.हि. कन्या विद्यालयात राष्ट्रप्रेम व समतेचा जागर

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १ ऑगस्ट २०२६ : येथील नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक निखारे सर होते. प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका हटवार मॅडम आणि शेंडे मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमात विद्यार्थिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा' या ऐतिहासिक चळवळीतील 'माझी मैना गावाकडे राहिली' या प्रसिद्ध छक्कडमधील एका प्रसंगाचे प्रभावी सादरीकरण केले. तसेच लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना, कार्य आणि विचार विद्यार्थिनींनी आपल्या ओघवत्या वक्तृत्वातून मांडले. या दोन्ही महान विभूतींच्या विचारांचा व कार्याचा गौरव करणारी प्रेरणादायी गीतेही विद्यार्थिनींनी सादर केली. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसर राष्ट्रप्रेम, सामाजिक समता आणि प्रेरणेच्या वातावरणाने भारावून गेला.

याप्रसंगी खंडाते मॅडम, निखारे सर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन खोब्रागडे मॅडम यांनी केले, तर काटेखाये मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

❁❁❁❁❁❁

## एलएमबी स्कूलमध्ये गुरुपोर्णिमा उत्सव



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दरवर्षीप्रमाणेच यावर्षी सुद्धा गुरूपोर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला.

वर्ग नर्सरी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्याच महत्व सांगून त्यांनी विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जसे विद्यार्थ्यांना बुकमार्क बनवायला लावणे, Letter to your guru, Quiz, Story Telling, Chalk and Talk, Guru Disciple Prayer असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

या निमित्याने विद्यार्थ्यांना वर्गात प्रश्न विचारण्यात आले. प्रश्न-मंजुषा द्वारे विद्यार्थ्यांमध्ये उत्तरे देण्याची कला अवगत झाली. तसेच गटाच्या प्रतिनिधीस विषय देऊन त्यावर त्यांचे मत विचारण्यात आले. त्यातुनच विद्यार्थ्यांमध्ये एकतेची भावना आणि धाडस निर्माण झाला. 'Chalk and Talk' च्या माध्यमातून विद्यार्थी आत्मविश्वासाने बोलणे, गुरूचे महत्व, संवाद कौशल्य विकास तसेच आपले विचार प्रभावीपणे व्यक्त करायला शिकले.

कार्यक्रमामध्ये शाळेचा संचालिका, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका आणि शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

❁❁❁❁❁❁

## शिष्यवृत्ती परीक्षेत सौम्या बिजवेचे यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PSE) २०२६ या परीक्षेत लोकमान्य टिळक प्राथमिक शाळा ब्रम्हपुरी या शाळेतील इयत्ता चवथी ची विद्यार्थिनी सौम्या संजय बिंजवे हिने यश संपादन केले आहे.

शाळेतून एकूण ४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी सौम्या बिंजवे हिने प्राविण्य प्राप्त करत शाळेचे नाव मोठे केले असून तिचे सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन केले जात आहे.

## बार फोडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश: चौघे अटकेत

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहर व परिसरात सलग दोन बार फोडून पोलिसांना उघड आव्हान देणाऱ्या अट्टल चोरांच्या टोळीचा ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ४ अट्टल आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून चोरी गेलेली विदेशी दारू आणि गुन्ह्यात वापरलेली तीन चारचाकी वाहने असा एकूण ११ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१७ जुलै २०२६ रोजी विद्यानगर, ब्रम्हपुरी येथील रहिवासी शंतनु प्रकाशराव बगमारे यांच्या मौजा अड्याळ येथील बारचे शटर वाकवून अज्ञात चोरांनी आत प्रवेश केला. बारमधील १,६६,८०५ रुपयांची विदेशी दारू व इतर साहित्य चोरून नेले. या प्रकरणी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. तपास सुरू असताना आरोपींनी चलाखी दाखवत सीसीटीव्ही कॅमेरे बंद करून चोरी केल्याचे समोर आले. पहिल्या घटनेचा तपास सुरू असतानाच अवघ्या आठ दिवसांच्या आत चोरांनी पोलिसांना पुन्हा आव्हान दिले. खरकाडा (ता. ब्रम्हपुरी) येथील अमीत दादाजी बनकर यांच्या बारचे मागील शटर वाकवून २,१३,२२७ रुपयांची विदेशी दारू व इतर साहित्य चोरले. पोलीसांनी दोन पथके तयार करून आरोपी सौरभ अनिल वाघाडे (वय २६, रा. बामणी, ता. नागभिड), जगदिश दिपक शेंन्द्रे (वय २५, रा. राममंदीर चौक, नागभिड), अभिषेक अशोक अलोने (वय २६, रा. कुनघाडाचक, ता. नागभिड) व विशाल दिवाकर ठाकरे (वय २३, रा. मांगली अरब, ता. नागभिड) यांना तांत्रिक विश्लेषण, तर्कशक्ती आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचे नेटवर्क उद्ध्वस्त करत चारही आरोपींना बेड्या ठोकल्या. गुन्ह्याचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे करत आहेत.

### ... QUOTES ...

"I'm a pretty tough guy, you know, I'm a pretty hard man, I've got a lot of compassion, but I don't waste time with poeple."
- Anthony Hopkins

### चारोळी

नको करू पाण्यात चिखल
कुणीतरी हे पाणी पिणार आहे...
जीवन स्वच्छ राहू दे, तुला पाहून
कुणीतरी जीवन जगणार आहे...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी









ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या प्री-स्कूल विभागामध्ये आषाढी एकादशीचा पवित्र सण दि. २५ जुलै २०२६ ला अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमात प्री-स्कूलच्या चिमुकल्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, गोरा कुंभार तसेच वारकरी यांची आकर्षक वेशभूषा परिधान करून सर्वांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरूवात विठ्ठल रखुमाई पुजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजराज आणि 'ज्ञानोबा तुकाराम' 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. चिमुकल्या वारकऱ्यांनी पारंपारिक दिंडीचे सुंदर सादरीकरण करून वारकरी संप्रदायाची ओळख करून दिली.

या वेळी विद्यार्थ्यांना विठ्ठल-रखुमाईची गाथा, आषाढी एकादशीचे महत्व तसेच संतांच्या जीवनातील कथा सांगण्यात आल्या. या उपक्रमातून मुलांना भक्ती, श्रध्दा, संस्कार, एकता आणि आपल्या सांस्कृतिक वारशाची माहिती मिळाली.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक कादिर वहाब कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम या सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. प्री-स्कूलच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आयोजन करून विद्यार्थ्यांना आनंददायी व संस्कारमुल्यांनी परिपूर्ण अनुभव दिला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.




Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.






# तलावातील 'त्या' गूढ पिवळया...

(पान क्र. १ वरून)

पोलीस उपनिरीक्षक रेखलाल गौतम, पोलीस अंमलदार शुभम लेडांगे, अमोल लोनबले आणि अभिषेक आगाशे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तलावाच्या तळाशी काय आहे हे शोधण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (SDRF) ४ जणांच्या विशेष पथकाला पाचारण करण्यात आले. SDRF च्या जवानांनी तलावाच्या पाण्यात उतरून सखोल शोधमोहीम राबवली.

शोधमोहिमे दरम्यान पथकाला तलावाच्या मध्यभागी तळाशी एक 'LED चार्जेबल लाईट' (ब्लिंकिंग लाईट) चालू स्थितीत मिळून आला. हा लाईट पाण्यात पडून किंवा कोणीतरी टाकल्यामुळे तो दर मिनिटाला पिवळ्या रंगात लुकलूकत असल्याचे उघड झाले. पोलीस आणि SDRF च्या या संयुक्त कामगिरीमुळे गेल्या काही दिवसांपासून नागरिकांमध्ये निर्माण झालेले गूढ, भीती आणि तर्कवितर्क आता पूर्णपणे थांबले आहेत. पोलीस प्रशासन व अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अफवांवर किंवा अलौकिक गोष्टींवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून 'ब्रह्मपुरी समाचार'च्या सजग पत्रकारितेमुळे आणि पोलीस व एसडीआरएफ च्या तत्परतेमुळे या रहस्याचा अखेर सुखद आणि सुरक्षित शेवट

# आज काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा

## आम. वडेट्टीवार व शिवानी वडेट्टीवार करणार नेतृत्व

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महिला, युवक, विद्यार्थी, ओबीसी समाज तसेच श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याच्या मागणीसाठी काँग्रेसच्या वतीने गुरूवार, दि. ६ ऑगस्ट रोजी ब्रम्हपुरी येथे भव्य जनआक्रोश महामोर्चा काढण्यात येणार आहे. विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार आणि युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे.

महामोर्चाद्वारे शासनाकडे सन २०२५-२६ मधील धान उत्पादक शेतकऱ्यांना धान बोनस देणे, २०१७ पूर्वी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देणे, राज्यातील स्मार्ट मीटर योजना रद्द करून बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर काढणे, गोसेखुर्द धरणाचे पाणी बारमाही उपलब्ध करून देणे, ओबीसी समाजाला खुल्या प्रवर्गातही आरक्षणाचा लाभ देणे, जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवणे, ओबीसी वसतिगृह प्रवेशासाठी बंद असलेले ऑनलाइन पोर्टल सुरू करणे, श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचे सहा महिन्यांचे थकीत मानधन तातडीने वितरित करणे, रासायनिक खते, कीटकनाशके व घरगुती गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या किंमती कमी कराव्यात, समाजकल्याण विभागाच्या निधीचा एससी-एसटी घटकांवरच खर्च करावा, कृषी पंपांची सौर योजनेतील सक्ती बंद करून पूर्वीप्रमाणे वीज जोडणी द्यावी, अयोध्येतील राम मंदिरातील दान चोरीप्रकरणी कठोर कारवाई करावी तसेच भंडारा-गडचिरोली समृद्धी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे सक्तीने भूसंपादन करू नये, या मागण्यांचा समावेश आहे.

# फवारा चौकातील सौंदर्यीकरणाचा फवारा धूळखात अवस्थेत

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहराच्या मध्यवर्ती भागातील सौंदर्यात भर घालण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'फवारा चौक' येथील फवाऱ्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. एकेकाळी शहराच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेला हा फवारा अनेक दिवसांपासून बंद असून, त्याच्या देखभाल व स्वच्छतेकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

फवाऱ्याच्या आतील भागात मोठ्या प्रमाणात कचरा, प्लास्टिक व घाण साचलेली असून नियमित साफसफाई होत नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर घालणारा हा परिसर आता विद्रूप बनला आहे. नगरपरिषद प्रशासनाने फवाऱ्याची तातडीने स्वच्छता करून आवश्यक दुरुस्ती पुन्हा कार्यान्वित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.


बुधवार बंद - दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404